**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

## मिरा भाईंदर महानगरपालिका हवा प्रदूषण व त्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी कायमच प्रयत्नशील
## हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून विविध उपाययोजना

मुंबई तथा उपनगरातील हवा प्रदुषणाचे प्रमाण वाढते असून हवेची गुणवत्ता खालावत चाललेली आहे. यावर नियंत्रणासाठी शासनामार्फत वेळोवळी निर्देश देण्यात येत आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात सुरू असलेले मेट्रोचे काम, निर्माणाधीन इमारती, वाढती वाहनसंख्या तसेच बदलते अनिश्चित वातावरण यामुळे शहरातील हवा प्रदूषण वाढलेले आहे. तसेच हवेची गुणवत्ता कमी अधिक प्रमाणात खालावत चालली आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत निर्गमित सुचनांनुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील धुळ नियंत्रणासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

ज्यामध्ये १) मिरा-भाईंदरमधील विविध ठिकाणी स्थिर, ट्रॉली माऊंटेड व गाडीवर फिरत्या मिस्ट स्प्रे मशीनव्दारे गार्डन, रस्ते, चौक, रस्त्यावरील दुभाजके, दुभाजकांमधील झाडे, मोठी उंच झाडे, पुतळे इत्यादी ठिकाणी पाण्याची दैनंदिन पाण्याची फवारणी करण्यात येत आहे. जेणेकरून धुळ नियंत्रण करता येऊ शकेल. २) घनकचरा विभागार्फत दैनंदिन रस्ते साफसफाई करण्यात येत असून धुळ नियंत्रणासाठी ब्रशव्दारे रस्ते साफसफाई करण्यात येत आहे. ३) कारखान्यांव्दारे होणारा कचरा खुल्या जागेत जाळण्यावर निर्बंध आहेत. याबाबत स्वच्छता निरीक्षकांमार्फत वेळोवेळी पाहणी करण्यात येत असून उघड्यावर न जाळण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. ४) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व सोशल मिडीयावर प्रसिध्द करण्यात आलेली असून त्यास व्यापक प्रसिद्धी देण्यात येत असून IEC वाहनाव्दारे पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. ५) बांधकाम विभागामार्फत सुरु असलेल्या विकासकामांच्या ठिकाणी ग्रीन नेट बसविणे, विकासकामाच्या साईटवरील डेब्रीज वाहून नेताना वाहनांना ग्रीन नेट लावणे. तसेच डेब्रीज उचलून घेण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत सुरू आहे. याबाबत संबंधित ठेकेदारांना सुचना देऊन त्यांची अंमलबजावणी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. ६) नगररचना विभागामार्फत विकासकांना बांधकाम परवानगी देताना बांधकाम साईटवर आवश्यकतेप्रमाणे ग्रीन नेट बसविणे, बांधकाम साईटवर येणाऱ्या जाणाऱ्या गाडयांचे टायर धुणेकरिता यंत्रणा कार्यान्वित करणे, डेब्रीज वाहून नेणाऱ्या वाहने बंदिस्त राहतील याची दक्षता घेणे, बांधकाम साईटवर सातत्याने पाण्याची फवारणी करणेबाबत विकासकांना कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने विकासकांना नोटीस देण्यात आलेल्या असून पुढील कार्यवाही सुरू आहे. ७) मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली हवा गुणवत्ता सुधारणा तसेच प्रदुषण नियंत्रण करणेकामी संबंधित विभागांच्या वेळोवेळी बैठका घेऊन त्यांना दिलेले अंमलबजावणी निर्देश व केलेल्या उपाययोजनांची माहिती घेऊन समन्वय साधण्यात येत आहे. ८) मिरा-भाईंदर शहरात येणारे डंपर, येणारे रेबिट, डेब्रिज, माती, टाकाऊ साहीत्य वस्तु वाहनांची तपासणी करणे, वाहने ताडपत्रीने झाकल्याची तपासणी करणे, माती/डेब्रीज रस्त्यावर पडत आहे किंवा नाही याची तपासणी करणे इत्यादी नियमांचे पालन करावयाच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत आहे. त्यासाठी गस्ती पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ९) उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत महापालिका हद्दीत विविध ठिकाणी शोभीवंत झाडे लावन ग्रीन स्पेस तयार करणे इत्यादींचा समावेश आहे.

मा. उच्च न्यायालयाचे निर्देश तसेच केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी निर्गमित केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर हद्दीतील हवेची गुणवत्ता सुधारणेकामी दि.०३/०१/२०२५ रोजी भारतरत्न ग्यानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह येथे मा. अयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विकासक, ठेकेदार व संबंधित विभाग यांची संयुक्त बैठक आयोजित करून संबंधितांना करावयाच्या कार्यवाहीबाबत आवश्यक सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ५ नुसार करावयाच्या निर्देशित कार्यवाहीबाबत संबंधित नगररचना, सर्व प्रभाग अधिकारी, बांधकाम/विद्युत, उद्यान, पाणी पुरवठा व मलनि:सारण, अतिक्रमण, अग्निशमन, घनकचरा, वाहन, परिवहन व पर्यावरण विभाग यांना पत्राव्दारे कळवून त्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. हवा प्रदुषणाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात येत आहे.

अशा विविध प्रकारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने हवा प्रदुषण नियंत्रणाकरीता तसेच हवेची गुणवत्ता सुधारणा करणेसाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. विकासाचा केंद्रबिंदू ठेऊन शहर प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिका सतत प्रयत्नशील राहील, असा विश्वास मनपा आयुक्तांनी व्यक्त केला आहे.